प्रकरण सहावे

# उपसंहार

प्रकरण सहावे

# उपसंहार

प्रस्तुत प्रकरणामध्ये पहिल्या पाचही प्रकरणांमध्ये केलल्या अभ्यासातून कोणते निष्कर्ष हाती येतात. याविषयीचा उहापोह करावयाचा आहे.

'१९६० नंतरची चरित्रात्मक' कादंबरी यापहिल्या प्रकरणांमध्ये चरित्रात्मक कादंबरी हा वाङ्मय प्रकार कादंबरी आणि चरित्र या मूळवाङ्मय प्रकारातून जन्माला असल्याचे पाहिले.तसेच 'चरित्र व आत्मचरित्र हा जुळा वाङ्मय प्रकार असून दोन्हीतून व्यक्तिदर्शन घडत असते. आत्मचरित्र हे स्वत: लिहिलेले असते. तर चरित्र हे एखाद्या लेखकाला भावलेल्या व्यक्तिमत्त्वावर लिहिले जाते.' १६६० नंतरच्या चरित्रग्रंथाकडे पाहिल्यास या काळात सामाजकारण राजकारण, अर्थकारण याबरोबर साहित्य, विविध खेळ, संशोधन क्षेत्र, शास्त्र,उद्योग, कला, संगीत, नाट्य, चित्रपट, अभिनय या सारख्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अनेक व्यक्तिंच्या जीवनाचा मागोवा या काळात घेतला गेला.

अभ्यासाच्या सोयीसाठी १९६० ते १९७५, १९७६ ते २००० तसेच २००१ ते २०१० अशा स्वरूपाच्या कालखंडानुसार विभागणी करून प्रतिनिधिक स्वरूपात या काळातील काही महत्त्वाच्या उल्लेखनीय चरित्रांचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

१९६० ते १९७५ या कालखंडात गं. दे. खानोलकर यांनी 'रविंद्रनाथ जीवन कथा' वि. स. सुखटणकर, यांनी 'शांतीनिकेतन', डॉ. धनंजय कीर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'महात्मा फुले' न. र. फाटक यांनी 'आदर्श भारत सेवक', 'लोकमान्य', ना. स. इनामदार यांनी 'दुसरा बाजीराव', वि. स. वाळिंबे यांनी 'यज्ञकुंड' व 'क्रांतीच्या ठिणग्या', मृणालीनी देसाई यांनी 'पुत्र मानवाचा' गंगाधर गाडगीळ यांनी 'दुर्दम्य', न. म. जोशी यांनी 'प्रेषित', भा. द. खेर यांनी 'अमृतपुत्र', आनंदभवन जोत्सना देवधर यांचे 'उत्तरयोगी' तु.बा. नाईक यांनी 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज' , चां. भ. खैरमोडे यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' तसेच राजा मंगळवेढेकर यांनी 'साने गुरूजी यांची जीवनगाथा.

अशा प्रकारे या काळात या थोर पुरुषांच्यावर विपुल लेखन झाल्याचे आढळते.

अभ्यासाच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या १९७६ ते २००० या काळात चरित्रलेखन करणारे चरित्रलेखक म्हणजे डॉ. उद्धव रसाळ यांनी 'निष्काम कर्मयोगी संत गाडगेमहाराज' वसंत पोतदार 'गाडगेमहाराज' मा. भि. काटकर 'गाडगेमहाराज', दे. ता. भोसले, यांचे 'लोकोत्तर गाडगेबाबा जीवन आणि कार्य' , वि. स. वाळिंबे यांनी 'सावरकर' , ज. द. जोगळेकर यांनी 'स्वातंत्र्यवीर सावरकर', 'वादळी जीवन' तसेच याच काळात इंदूमती केळकर यांनी 'सावित्री ज्योती' हि. गों. बनसोडे 'आभाळा ऐवढी', माधव गडकरी 'राम गणेश गडकरी' तसेच बंधु माधव यांनी 'रमाई', मा. गो. माळी यांनी क्रांतीज्योती.

शंकर साठे यांनी 'माझा भाऊ अण्णा भाऊ' तसेच नावारूपास आलेल्या याच काळात यशवंत मनोहर यांनी 'बा.सी. मर्ढेकर' तसेच बा. ग. पवार 'ग्रामीण शिक्षण चळवळीचे जनक कर्मवीर भाऊराव पाटोल' बा. म. ठोंके यांचे 'मला समजलेले कर्मवीर', द. ता. भोसले यांनी कुमारांचे कर्मवीर, न. र. फाटक सहा थोर पुरुष, विद्या सप्रे-चौधरी यांनी 'गुढयात्री', 'अर्ध्यदान', राजा मंगळवेढेकर यांनी 'इंदिरा गांधी' रविंद्र भट यांनी 'सत्यं शिवं सुंदरम' अरुणा ढेरे 'महाद्वार', शिवाजीराव भोसले 'मुक्तीगाता', य. दि. फडके 'आगरकर' रविंद्र ठाकूर 'महात्मा' नागनाथ कोत्तापल्ले जोतीपर्व, धनंजय कीर 'महात्मा फुले' त्याचप्रमागे बा. ग. पवार यांनी 'युगपुरुष महात्मा जोतिराव फुले' त्याचप्रमाणे बा. ग. पवार यांनी 'युगपुरुष महात्मा जोतिराव फुले' तसेच शंकरराव कदम यांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यासारख्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय व्यक्तिंबरोबर कवि, लेखक व कलावंत यांच्या जीवनावर या काळात चरित्र लेखन केले गेले.

अभ्यासाचा तिसरा कालखंड म्हणजे २००१ ते २०१० या काळातील चरित्रांमध्ये भ. ग. बापट यांनी 'विनोबा', ग. प्र. प्रधान 'एस. एम. जोशी 'स्वातंत्र्यसेनानी' व समाजवादी नेते राजा मंगळवेढेकर 'सेनानी साने गुरूजी' भारत पाटणकर क्रांतिसिंह नाना पाटील : एक अखंड क्रांतिकारक तसेच के. र. शिरवाडकर यांनी तो प्रवास सुंदर होता. किशोर सानप यांचे समग्र तुकाराम दर्शन, प्रा. श्रीकांत नाईक 'पद्मभूषण डॉ. जे. पी. नाईक चरित्र व कार्य, तसेच सागर देशपांडे यांनी 'प्रतिभावंत' शिक्षणतज्ज्ञ डॉ. जे.पी. नाईक, हेमंत देसाई 'सारथी' छाया महाजन 'राष्ट्रपती: प्रतिभाताई पाटील' तसेच वि. र.काळे 'डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन', रविंद्र कोल्हे 'शांततेचे नोबेल पारितोषिक विजेते बराक ओबामा' सुषमा नानोटी यांचे दिव्यत्वाची जेथे


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रचिती तसेच दिनकर जोशी यांचे सुषमा शाळीग्राम यांनी अनुवादीत केलेले 'चक्र ते चरखा' अशा प्रकारची अनेक महत्त्वपूर्ण चरित्रे या काळात लिहिली गेली. या चरित्रांचा थोडक्यात आढावा घेऊन संत साहित्याच्या दृष्टीने अभ्यासासाठी याच काळातील मंजुश्री गोखले यांची 'तुकयाची आवली' या चरित्रात्मक कादंबरीचे स्थान निश्चित केले आहे.

मंजुश्री गोखले यांचे वाङ्‌मयीन व्यक्तिमत्त्व या दुसऱ्याप्रकरणामध्ये लेखिका मंजुश्री गोखले यांचे बालपण,शिक्षण अनुभव यांचे प्रकाशित साहित्य-लेख, कथासंग्रह, एकांक्किका, गझल संग्रह, कविता संग्रह, चारोळी संग्रह, निसर्ग कविता,बालगीते,चित्रपटगीते याशिवाय चित्रपट कथा- पटकथा संवाद विविध विषयावरील व्याख्याने त्यांचा कविसंमेलनातील सहभाग इत्यादी बाबींचा आढावा या दुसऱ्या प्रकरणात घेऊन लेखिकेचा सर्वांगीण परिचय घडविला आहे.

प्रकरण तिसरे 'तुकयाची आवली' कादंबरीचा आशय असे असून यामध्ये कादंबरीचे कथानक व्यक्तिचित्रणे, घटनाप्रसंग इत्यादी घटकांच्या अनुषंगाने अभ्यास केला आहे.

"आशय म्हणजे कादंबरीचा गाभा होय."[१] कादंबरी उभारणी साठीच्या रूपबंधात कादंबरीचे कथानक, भाषाशैली निवेदन पात्रचित्रण, प्रसंग, वातावरण इत्यादी महत्त्वाचे घटक असतात. आशय सूत्राविषयी गंगाधर पाटील म्हणतात. " आशयसूत्र म्हणजे साहित्यकृतीच्या आशयसूत्राचे किंवा अनुभवाचे विश्वाचे केंद्रवर्ती व मध्यवर्ती सूत्र होय"[२] कथानक हा कथात्म तसेच नाट्यात्म साहित्याचा एक महत्त्वाचा घटक असतो. कथानक हे विविध घटकांनी बनलेले असते. प्रस्तुत कादंबरीच्या कथानकातून आवलीच्या जीवन 'प्रवासाचा वेध' घेताना तिचे संघर्षमय जीवन चित्रित होते.एका संसारदक्ष, जिद्दी आणि परिस्थितीने घायाळ होवून धीट बनलेल्या आवलीचे बालपण,विवाह, संसार आणि पतिनिष्ठा यामुळे तुकारामांना मिळालेली तिची साथ. संसार आणि द्रारिद्र्य व तुकारामांची विठ्ठलाची अतुट भक्ती यांच्याशीच त्या भावविश्वाला मुकाबला करावा लागतो. याचे चित्रण कादंबरीत केले आहे.

कादंबरीमध्ये दोन प्रमुख व्यक्तिरेखा म्हणजे 'आवली' व 'तुकाराम' तर गौण व्यक्तिरेखांमध्ये पुरुष व्यक्तिरेखा व स्त्री व्यक्तिरेखा तसेच एखाद्या प्रसंगातच येणाऱ्या इतर व्यक्तिरेखांचा समावेश केला आहे.

'कादंबरीच्या आशयसूत्रामध्ये घटनाप्रसंग हे घटक व्यक्तिरेखेशी अतुटसंबंध प्रस्थापित करीत असतात. हे घटक कथासूत्राला अपरिहार्यपणे पुढे खेचित असतात.' [३]
आशय सुत्राविषयी प्रभा गणोरकर लिहितात, 'एखादी स्थूल अथवा व्यापक विचारप्रणाली कल्पना अथवा संकल्पना अनुभूती किंवा तत्त्व म्हणजे आशयसूत्र होय'[४] या दृष्टीने विचार करता येणाऱ्या अनेक कादंबरीत लघटना प्रसंगाचा उल्लेख या प्रकरणामध्ये केला आहे.

प्रकरण चौथे यामध्ये 'तुकयाची आवली' मधील व्यक्तिरेखेचे स्वरूप या प्रकरणात प्रमुख व्यक्तिरेखा असणारी आवली व तुकारामयांच्यासह गौण व्यक्तिरेखा व इतर व्यक्तिरेखा यांचास्वभातील वैशिष्ट्ये स्पष्ट केलेली आहेत.

आवलीच्या व्यक्तिरेखेतून लहानपणी सालस व थोडीशी दूराग्रही विवाहानंतर संसारी, कर्तव्यनिष्ठ, कुटुंबवत्सल, कष्टांवर श्रद्धा असणारी, पतिनिष्ठ अशी दिसून येते तसेच तुकाराम आपल्या निस्सिम भक्तीनं अभंगवाणीनं, विद्वतेनं संतपदाच्या शिरोमणीपदावर पोहोचलेले तुकाराम सालस, पापभीरू, देवभोळे, पण कुटुंबवत्सल, प्रेम,समंजस व भावूक, भूतदयावादी, परोपकारी, कृतज्ञ क्षमाशील वृत्तीचे असल्यचे कादंबरीतून दिसून येते.

साहित्यिक हा व्यक्तिंच्या स्वभावातील विविध छटा तो प्रतिभेच्या सहाय्याने निर्माण करीत असतो. निरनिराळ्या प्रसंगी पात्रांच्या भावना काय असतील याचा अंदाज लेखक घेत असतो. या दृष्टीने विचार करता कादंबरीतील आवलीची आई, गुणाबाई, सई, कनकाई, रूक्मिणी, सारजाक्का, काशीबाई तसेच आप्पाजी, बोल्होबा, राऊ, माणकू, बाळाजी सावकर, भिकंभट या व्यक्तिरेखा मधून माणूसकीचे दर्शन घडून येते तर लालजी सावकाराच्या व्यक्तिमत्त्वातून 'सावकारी पाश' या वृत्तीचे दर्शन घडविले आहे. त्याचप्रमाणे रामेश्वर भटासारख्या व्यक्तिमत्त्वातून सनातनी प्रवृत्तीचे दर्शन घडविले आहे.

प्रकरण पाचवे 'वाङ्मयीन व भाषिक वैशिष्ट्ये' या मध्ये कादंबरीचे कथनाक,भाषाशैली, निवेदन पद्धती, अलंकारिकता, कल्पनाविलास, त्या कालखंडातील लोकजीवन यामध्ये सांस्कृतिक जीवन, लग्न, सण, उत्सव,खेळ,रूढी, परंपरा, सामाजिक न्यायनिवाडा, धार्मिक जीवन, निरनिराळे साथीचे रोग, औषधोपचार, औषधी वनस्पती, तेथील व्यवसाय,पीके, दुष्काळ, सामाजिक जिव्हाळा, एकता, त्याचबरोबर संघर्ष आणि


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

रसाविष्कार अशा अनेक घटकांच्या पार्श्वभूमीवर सदर कादंबरीची चिकित्सा केली असून प्रस्तुत कादंबरीचे वेगळेपण सिद्ध केले आहे.

उपसंहार या सहाव्या प्रकरणामध्ये वरील पाचही प्रकरणांच्या अंती हाती आलेले निष्कर्ष नमूद केलेले आहेत. ते खालीलप्रमाणे.

१) 'तुकयाची आवली' कादंबरीच्या कथानकामधून आवलीचा जीवन संघर्ष चित्रित झाला आहे.

२) 'तुकयाची आवली' या कादंबरीमध्ये येणारी व्यक्तिरेखा या त्यांच्या स्वभावाच्या गुण दोषांसह नजरेस पडत असल्यामुळे त्यांचे वेगळेपण सिद्ध झाले आहे.

३) कादंबरीमध्ये घटना-प्रसंगाच्या मदतीने आवलीच्या मनाची कुचंबणा, तुकारामांची विठ्ठल भक्ती या मधून आवली - तुकारामांच्या जीवनातील विदारक सत्य उलगडून दाखविण्याचा लेखिकेचा प्रयत्न दिसतो.

४) कादंबरीतील कथानक, भाषाशैली,निवेदन पद्धती, अलंकारिकता यांचा अभ्यास करताना घटना प्रसंगासाठी बोली, घरगुती वळणाची भाषा वापरल्याचे जाणवते तर निवेदनाच्या भाषेमधून प्रमाण भाषेचा अविष्कार होताना दिसतो.

५) तुकाराम कालिन कालखंडातील लोकजीवन सांस्कृतिक जीवन, न्यायनिवाडा, रोग, औषधे, व्यवसाय,एकता, जिव्हाळा इत्यादी घटकांच्या माध्यमातून त्या काळातील जीवनपद्धतीची वास्तवता कशी होती याचे दर्शन घडविण्याचा लेखिकेचा हेतू आहे.

६) कादंबरीत शेवटी तुकाराम महाराजासांख्या तेजस्वी सूर्याची त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक चांगल्या वाईट क्षणाची भागीदार आणि साक्षीदार असलेली आवली आपल्या जीवन संघर्षात कजागपणा, भांडखोरपणा या विषणांचा डाग पुसून ती सर्वस्वी तुकयाची आवली बनल्याचे दिसते.

अशा प्रकारे हाती आलेल्या निष्कर्षांनंतर परिशिष्ट आणि संदर्भग्रंथ सूची दिलेली आहे.

## संदर्भसूची


१. मोटे, कृष्णाबाई : '१९६८ मधील चरित्रे, आत्मचरित्रे व आठवणी' (लेख), ललित अंक मे, १९६९, पृष्ठ क्र. २८, २९

२. पाटील, गंगाधर : 'आशयसूत्र आणि आशयसूत्र मीमांसा', अनुष्टुभ, मार्च-एप्रिल २००२, पृष्ठ ९

३. बांदिवडेकर, चंद्रकांत : 'मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता प्रकाशन, पुणे, तृ. आ. १९७३, पृ. क्र. ४

४. गणोरकर, प्रभा आणि इतर : 'वाङ्मयीन संज्ञा, संकल्पना कोश', प्रका. ग. रा. भटकर फाऊंडेशन, मुंबई, पृ. क्र. ११७